# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई (गट—ब) (राजपत्रित), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**

धारिका क्रमांक : ९६६(२३)/१२५८/पंधरा जाहिरात क्रमांक : ०९ /२०१५

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या आस्थापनेवरील **सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई (गट—ब) (राजपत्रित)** या पदाच्या एका जागेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करु शकतात.

२ . उपलब्ध पदसंख्या :-

| पदसंख्या | अमागास |
|---|---|
| १ | १ |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. आस्था - २००५/ प्र.क्र.११३/ सां.का.१, दिनांक २५ ऑगस्ट, २००५ च्या अनुषंगाने (अ) क्षीणदृष्टी ( Low vision) (ब) श्रवणशक्तीतील दोष, HH(Hearing Handicapped), आणि **(क)** चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or cerebral palsy) प्रवर्गाचे विकलांग असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.**तथापि विकलांग वर्गवारीसाठी पद आरक्षित नाही**.

**३. वेतनश्रेणी : पे बॅण्ड** रु. ९३००-३४८००/-, ग्रेड पे ४४००/- अधिक इतर भत्ते -

**४. पात्रता-**

**४.१ दिनांक १ जुलै, २०१५** सर्व उमेदवारांकरीता ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.२** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिलक्षम राहील.

**४.३ अर्हता** — पदवी आणि तद नंतर.

**४.४** राज्य शासनाच्या विभागात/कार्यालयात अथवा निमशासकीय कार्यालयात अथवा स्थानिक प्राधिकरणात, अधीक्षक किंवा त्यांच्याशी समकक्ष पदावरील प्रशासकीय कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.

**४.५** मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पूरेसे ज्ञान

**५ परिविक्षाधिन कालावधी** - २ वर्षे

**६.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे किंवा अन्य योग्य निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**७. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**८.** कर्तव्ये व जबाबदाऱ्या - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**९ . शुल्क : -सर्व उमेदवारांना रु. ५१५/-**

**९.१. मागासवर्गीय उमेदवार वयोमर्यादेत बसत असल्यासच या पदाकरता अर्ज करु शकतील.**

**१०. अर्ज करण्याची पध्दत** —

**१०.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१०.२**पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज www.mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ३१ मार्च, २०१५ ते दिनांक २० एप्रिल, २०१५** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**१०.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१०.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
**१०.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

**१०.६** www.mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.
**१०.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-
(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.
(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह सेल. ज्या पदासमोर '**Unpaid**' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.
(३) "**Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३)चलानद्वारे
(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.
(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.
(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.
(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.
**११.** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
**१२.** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.
**१३.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
**१४.उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**
**१५.विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**
**१६. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २१ एप्रिल, २०१५ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- ३१ मार्च, २०१५**

**राजन बा. खोत**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**